# जिल्हा व सत्र न्यायालय – जळगांव.

## जा ही र नि वि दा.

जळगांव जिल्हयातील तमाम कार्यालयीन उपयोगितेची स्टेशनरी पुरवठाकारांना याद्वारे कळविण्यात येते कि, याकामी ज्या पुरवठाकारांस खालील स्टेशनरी पुरविणेस स्वारस्य असेल त्यांनी आपले दरपत्रक भरुन बंद पाकिटातून, पाकीटावर कार्यालयीन स्टेशनरीचे कोटेशन असा उल्लेख करुन, मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव या नावाने बंद पाकीट करुन म. प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव, कक्ष कमांक 101 यांच्याकडेस दि.28/03/2022 पर्यत कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन दिवशी सादर करावीत. त्यांनतर प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. दरपत्रके दि. 29/03/2022 रोजी मा. जिल्हा न्यायाधीश –1, यांचे निजी कक्षात उघडले जातील.

कार्यालयीन उपयोगाकरीता खालील प्रमाणे स्टेशनरी उधारीवर खरेदी करावयाची आहे.

| अ.क. | खरेदी करण्याची वस्तु | प्रकार | संख्या |
|---|---|---|---|
| 1 | झेरॉक्स पेपर | A4 Size चा 75GSM | 500 रिम |
| 2 | जज्जमेंट पेपर | A4 Size चा 100GSM | 200 रिम |

## सर्वसाधारण अटी

1. दरपत्रक स्विकारल्यानंतर पाच दिवसांत उपरोक्त प्रा. वस्तुंचा पुरवठा जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव येथे स्वखर्चाने करावा लागेल. सदरील वस्तुंचा दर्जा उत्कृष्ट आणि उच्च प्रतीचा असावा नसल्यास स्विकाराला जाणार नाही.

2. दरपत्रक स्विकारण्याचा/नाकारण्याचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश जळगांव यांच्याकडेस राखून ठेवला आहे. दरपत्रक भरतांना दर अंकात व अक्षरी असे दोनही प्रकारे भरावेत.

3. दरपत्रक सर्व करांसह दरपत्रक भरावे. मात्र जीएसटी टॅक्स असल्यास त्याचा स्वतंत्र दर नमुद करावा. त्याचवेळी महाराष्ट्र शासनास पुरवठा केल्यास तरतुदीप्रमाणे सुट दिली जाते त्या अटीस आधीन राहून दरपत्रक दयावे लागेल. तसेच बिलाची रक्कम अदा करतांना नियमानुसार टी.डी.एस. कपात करण्यांत येईल.

4. उपरोक्त वस्तु अनुदानाअभावी कमी जास्त प्रमाणात खरेदी करण्याचे अधिकार म. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश जळगांव यांच्या कडेस राखून ठेवण्यात आलेले आहेत. तसेच उपरोक्त वस्तुं उधारीवर खरेदी करावयाचे आहेत. तसेच सदर बीलाची रक्कम अनुदान उपलब्धतेनुसार देण्यांत येईल.

5. दरपत्रक उघडण्याच्या दिवशी व नमुद वेळी दरपत्रक पाठविणा–यांनी प्रत्यक्ष हजर रहावे अथवा प्रतिनिधी पाठवावा अन्यथा त्यांच्या गैरहजेरीत दरपत्रक उघडणेत येतील.

6. दरपत्रकातील दर दिनांक 31.12.2023 अखेर कार्यरत राहतील. अगर त्यानंतरही त्याच दरात पुरविली जातील त्या कालावधीचा खुलासा स्पष्ट करावा.

7. नमुद वस्तूंचा पुरवठा आदेश देवूनही मुदतीत न केल्यास पुरवठा आदेश रद्द करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांनी राखून ठेवला आहे.

प्र.प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
जळगांव

म.जा.क./१८०६/2023
जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव
दिनांक. 27/03/2023.

प्रत माहिती करीता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दी करीता.

1. म.जिल्हाधिकारी,जळगांव.
2. म.तहसिलदार,जळगांव.
3. म.दिवाणी न्यायाधिश व.स्तर,जळगांव.
4. जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव.
5. मुख्य न्यायदंडाधिकारी,जळगांव.
6. जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर